
ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Issue : XVI, Vol. V
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 5.67
ISSN 2250-169X
Dec. 2018 To May 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study on the Role of Financial Ratios in Credit Rating<br>**Dr. A. J. Raju** | 1 |
| 2 | John Masters Savage Novel - Night Runners Of Bengal<br>**Dr. Purushottam Deshmukh** | 7 |
| 3 | E-Resources And Its Challenges For Libraries<br>**Dr. A.B. Sarkale** | 19 |
| 4 | Rural Women Status<br>**Sandhya Dattarao Kadam** | 25 |
| 5 | A Study of Nutritional Balanced Dieat<br>**R. N. Kale** | 28 |
| 6 | Fitness Among Volleyball and Hockey women Players of Osmanabad District<br>**Dr. Dilip Nathrao Gitte** | 33 |
| 7 | अमरावती शहराचे भूमी उपयोजन<br>**डॉ. दिनेशकुमार सिनकर** | 37 |
| 8 | महाराष्ट्रातील सण-उत्सवाचा विश्लेषणात्मक आढावा<br>**डॉ. बी. एस. लासूरे** | 42 |
| 9 | अण्णा भाऊ साठे यांचा क्रांतीकारी 'फकिरा'<br>**डॉ. शिवाजी जवळगेकर** | 48 |

मुळ देशवासियांना आपल्या चिंतनाचा, कलाकृतींच्या केंद्रस्थानी ठेवून नवीन समतावादी जाणीवा रूढ करणारे आग्रही लेखक. अण्णा भाऊ साठे हे विचारवंत लेखक असल्यामुळेच श्रमिकांचा सिद्धांत मांडून प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र नाकारून 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून, श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे' असे ठामपणे सांगून क्रांतीबिजे पेरली आहेत.

अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र वाङ्मयनिर्मितीतील एक वारणा खोऱ्यातील सोनेरी पान म्हणजे अजोड कलाकृती 'फकिरा' होय. जो लेखक मूल्यांसाठी लेखन करतो, तोच मूल्यांत्मक कलाकृतीचीही निर्मिती करतो. प्रतिभासंपन्न आणि तत्त्वचिंतक निर्माता हा समाजाचा दृष्टा वाटाड्या असतो. अण्णा भाऊ साठे यांना क्रांतिकारांच्या भूमिने एकाचवेळी क्रांतिकारीही बनविले आणि क्रांतिकारकांच्या इतिहासाचे साक्षीदारही. प्रत्येक घटनेचा काळ हा मोठा साक्षीदार आणि गुरुही असतो. काळानेच अण्णा भाऊ साठे यांना वाटेगाव, वारणाखोरे, कृष्णाखोरे आणि कासारखोऱ्यात फिरविले. प्रतिभासंपन्न कलावंताचे मन आणि डोळे असलेल्या राष्ट्रभक्त संवेदनशील प्रतिभासंपन्न अण्णा भाऊंना स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळाचे साक्षीदारही. अण्णा भाऊ साठे यांचा पिंड हा संघर्षशाली असल्यामुळेच अन्याय, अत्याचार, शोषणाविरोधी लढणाऱ्या नायकांची निर्मिती केली. कथा, कादंबरी, नाटकातील व्यक्तिरेखा या भेदातील जीवन जगणाऱ्या आहेत. अण्णा भाऊ साठे यांचा 'फकिरा' मराठी वाङ्मय सृष्टीत अजरामर झाला. 'फकिरा' एक वास्तववादी इतिहास आणि स्वाभीमानी चळवळीचा इतिहास आहे. अण्णा भाऊंनी फकीरातून स्वातंत्र्यपूर्व काळातील वर्णव्यवस्था, धर्मव्यवस्था, ग्रामव्यवस्था, ब्रिटिश राजवटीचे रौद्ररूप आणि सहन न होणारी हुकूमशाही, दलितांना नरक यातना भोगाव्या लावणाऱ्या जमीनदार खोतांची दंडेलशाही आणि ब्रिटिशांचे खबरीलाल म्हणून जगण्याची अनुवंशीक वृत्ती. दुबळ्यांचे शोषण.तीनवेळची दलितांची हुकूम हजेरी. मानवनिर्मित संकटे आणि निसर्ग निर्मित दुष्काळाचे संकट अज्ञानी लोकांची श्रद्धा. विष्णुपंत कुलकर्णी आणि शंकर पाटलाच्या मानवतावादी दृष्टिकोनामुळेच ग्रामपातळीवरच ग्रामप्रतिष्ठेसाठी शिगावच्या यात्रेतून प्राणाची पर्वा न करता सर्वांसाक्षी जोगणी पळवून आणणारा शूर राणोजी हा फकिराची प्रेरणा आणि आदर्श. शिगावच्या खोतांनी रिवाज मोडून राणोजीचा शिरच्छेद करणे ही निंदाजनक कृती आहे. संपूर्ण गाव अस्वस्थ होतो परंतु बापाच्या बलिदानाचे ऐतिहासिक महत्त्व फकिरा विसरल नाही. अनुवंशिकरीत्या फकिरा हा पराक्रमी, आदरभावाने वर्तन करणारा,

क्रांतिकारक फकिरा.

१३. ग्रामप्रतिष्टा आणि समाजहितार्थ करारी माणसांसाठी आत्मसर्मण करणारा धुरीन.

उपरोक्त सर्व गुण आणि सामर्थ्यशाली शक्ती म्हणजे 'फकिरा' फकिराच्या कर्तृत्वाला सलाम करताना वैशाली भालसिंग यांनी नोंदविले आहे की, 'फकिरा या कादंबरीचा नायक हा लोकनायक आहे'. फकिरा नावाचे एक वादळ वारणा खोऱ्यात निर्भिडपणे गबऱ्यावर स्वार होऊन भ्रमंती करत असल्यामुळेच प्रबोधनाच्या इतिहासाच्या, कर्तृत्वाच्या, औदार्याच्या मुद्रा उमटल्या आहेत. फकिरा नावाची वारणा खोऱ्यातील क्रांतिकारक एक त्यागी संस्कृती होती. कादंबरीचा नायक हा चळवळीचा नायक होणे दुर्मिळच असते. फकिराने सूड भावनेने वर्तन केले नाही. 'आब्रू खाऊन, उपाशी माणस जगत नसतात' हाच नैतिकतेचा आचरण सिद्धांत फकिराने मांडला आहे. समतोल न्यायभूमिका वारणा खोऱ्यातील फकिराने प्रत्येक संवेदनशील वाचकांना अंतर्मुख केले. ब्रिटिश आणि शोषक सत्तेविरूद्ध फकिरा नावाचे वादळ - चक्रीवादळच होते. अनुवंशीकरीत्या कुटुंब वत्सल आणि शत्रूंसाठी करारी स्वभावाचा. सत्यासाठी संघर्ष करणारा. अन्यायाविरूद्ध निर्भिडपणे लढणारा. क्रांतिकारकांचा बंडखोर क्रांतिकारक. सामाजिक समतेसाठी अष्टप्रहर झूंजणारा. अजस्त्र शक्तीचे प्रतिक, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात निष्ठेने लढणारा देशभक्त. शूरवीरांचा आदर्श. मृत्यूचे भय न बाळगणारा धाडसी. डोंगरदऱ्यात राजासारखा वावरणारा. राष्ट्रभक्तींचा आदर्श मैत्रीसाठी त्याग करणारा त्यागी. स्त्रींया आणि दुबळ्यांचा कैवारी. गबऱ्या नावाच्या घोड्यावर स्वत:इतकेच प्रेम करणारा प्रंसगोपात बौद्धिक कौशल्याचा वापर करून शत्रूंना पराभूत करणारा. भौगोलिक संपूर्ण ज्ञान असणारा छत्रपती शिवाजी महाराजांनी आमच्या वंशजांना ही तलवार दिली आहे असे ठणकावून सांगून आपल्या ऐतिहासिक प्रेरणेविषयी श्रद्धायुक्त आदर ठेवणारा. दुबळ्यांच्या रक्षणार्थ शंकरपाटील भाकरी देण्यासाठी माळेवाडीच्या मठ लुटीनंतर समतेचे तत्व स्विकारून समान वाटणी करणारा समतावादी साक्षीदार.महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि कार्ल मार्क्सच्या समग्र परिवर्तनाच्या सिद्धांताची मांडणी अण्णा भाऊ साठे यांनी फकिरातून साधार चित्रित केली आहे. जोगणी ही धार्मिक दंतकथा ही केवळ आरंभाची पार्श्वभूमी आहे.